# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक , उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती-२०२३-२४/डीबीटी/फी मंजूरी/ 2373 दि.१२.१०.२०२२

**तात्काळ**

प्रति,
प्राचार्य / संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषय: शिष्यवृत्ती योजनांची सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ: मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२३-२४/डीबीटी/फी मंजुरी, दि.०५.१०.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांच्या महाविद्यालयांचे महाडीबीटी पोर्टलवरील प्रोफाईल अद्ययावत असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाविद्यालयाचे नांव, पत्ता, लिपिक व प्राचार्य यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक तसेच महाविद्यालयातील अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांचे शुल्क अद्ययावत करणे आवश्यक आहे. **सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांना त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याची सुविधा दि.०३.१०.२०२३ पासून देण्यात आलेली आहे.**

- **महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचेसाठी सूचना:**

01. महाविद्यालयातील लिपिक व प्राचार्य यांनी त्यांचे महाडीबीटी पोर्टलच्या **युजर आयडी व पासवर्ड च्या आधारे लॉगीन करुन महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्ययावत करावयाचे आहे.**
02. महाविद्यालयांच्या प्राचार्य लॉगीनमध्ये महाविद्यालयाची चालू अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. (उदा.महाविद्यालयात नव्याने सुरु झालेला अभ्यासक्रम Add करणे)
03. **शासन / विद्यापीठ यांनी निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणेच महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रमाचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच शुल्क निश्चितीबाबतची कागदपत्रे पडताळणीसाठी महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.**

०४.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी एकूण १६ प्रकारच्या इतर शुल्काच्या बाबींचा लाभ देण्यात येतो. तथापि महाडीबीटी पोर्टलवर इतर शुल्काच्या १० बाबींचा समावेश असल्यामुळे महाविद्यालयांनी इतर शुल्काची माहिती पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार भरण्याबाबत दक्षता घ्यावी.

ST. WILFRED'S COLLEGE OF LAW SHEDUNG PANVEL 410206

PRINCIPAL
ST. WILFRED'S COLLEGE OF LAW
SHEDUNG-PANVEL 410206

| Sr. No. | महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध इतर शुल्काच्या बाबी | महाविद्यालयांनी भरावयाच्या इतर शुल्काच्या बाबी |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | Admission Fee |
| 2 | Enrollment Fee | Enrollment Fee |
| 3 | Gymkhana Fee | Gymkhana Fee |
| 4 | Laboratory Fee | Laboratory Fee |
| 5 | Library Fee | Library Fee |
| 6 | Project Fee | Project Fee |
| 7 | Semester Fee | Semester Fee |
| 8 | Session Fee | Session Fee |
| 9 | Study Tour | Study Tour |
| 10 | **Other Fee** | 01. College Magazine Fee |
| | | 02. Computer Training Fee |
| | | 03. Extra Curriculum / Activity Fee |
| | | 04. Registration Charges |
| | | 05. Student ID Charges |
| | | 06. University Development Fund |
| | | 07. University Sports Fund |
| | | 08. University Ashwamedh Fund |
| | | 09. University Medical Aid Fund |
| | | 10. University Students Assistance Welfare Fund |
| | | 11. University Student Insurance Fund |
| | | 12. Youth Festival Charges |

01. **महाविद्यालयांनी पोर्टलवर अद्ययावत केलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क या माहितीच्या आधारेच शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात येणार असल्यामुळे सदरची माहिती अचूक नमूद करणे आवश्यक आहे.**
02. महाविद्यालयाचे लिपिकांचे लॉगीनमधून अद्ययावत केलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क याबाबतची माहिती केवळ पाहता येते, तथापी सदर माहितीमध्ये काही बदल हवा असल्यास तो प्राचार्य लॉगीनमधूनच करता येईल.
03. महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबतची माहिती **दि.1.12.2023 पर्यंत** भरुन त्यास संबंधित विभागीय सहसंचालक / सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.
04. महाविद्यालयांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबतची माहिती भरतांना अभ्यासक्रमाचा जेवढा कालावधी असेल त्यापेक्षा दोन वर्ष अधिक कालावधीचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. (उदा. B.A. अभ्यासक्रमाचा कालावधी 3 वर्षांचा असल्याने, सदर अभ्यासक्रमाची मागील 5 वर्षाची माहिती भरणे आवश्यक आहे.)
05. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क (शिक्षण शास्त्र, शारीरिक शिक्षण शास्त्र, विधी अभ्यासक्रम) हे बॅच प्रमाणे भरणे आवश्यक आहे.
06. महाविद्यालयांनी डीबीटी पोर्टलसंदर्भात येणाऱ्या अडचणींसाठी प्रस्तुत कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या अडचणी सोडवून पुढील कार्यवाही करावी.

ST. WILFRED'S COLLEGE OF LAW SHEDUNG PANVEL 410206

PRINCIPAL
ST. WILFRED'S COLLEGE OF LAW
SHEDUNG-PANVEL 410206

07. तसेच महाडीबीटी पोर्टल संदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणींसाठी महाडीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या Grievance या लिंकच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने सुस्पष्ट आणि उदाहरणांसह (Screenshot) सह तक्रारी नोंदविण्यात याव्यात व त्या सोडविल्याची खात्री करुन घ्यावी.

08. महाविद्यालयांनी इन्स्टिटयुट प्रोफाईल अद्ययावत करणेसाठी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या व्हिडीओ व मॅन्युअल पाहून त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास त्यांच्या अडचणी व शंकांचे निरसन होईल.

**महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी त्यांचे प्रोफाईलमध्ये भरलेल्या अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक / सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूरी दिल्यानंतर त्यानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतात. त्यामुळे सदरची माहिती काळजीपूर्वक व जबाबदारीने भरणे आवश्यक आहे.**

महाडीबीटी पोर्टलवर अभ्यासक्रमांचे शुल्काची माहिती भरतांना त्या त्या अभ्यासक्रमास विद्यापीठ / सक्षम प्राधिकरण यांनी मान्यता दिल्याप्रमाणेच नोंदविण्याबाबत मा. संचालनालय व प्रस्तूत कार्यालयाकडून वेळोवेळी सूचीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे पोर्टलवर विचारण्यात आलेले सर्व शुल्क व इतर शुल्काची अचूक परिगणना करुन सदर शुल्कांना ज्या ज्या संबंधित प्राधिकरणांकडून **(विद्यापीठ / शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण)** यांच्याकडून मिळालेल्या मान्यतांचे संदर्भ **हमीपत्रात (Annexure 1, Declaration of Fees) मध्ये नमूद करणे व ते हमीपत्र (Annexure 1, Declaration of Fees)** इतर शुल्काच्या **(Other Fees) Annexure 2 तक्त्यासह आपल्या महाविद्यालयाचे** Letterhead वर प्रिंट काढून प्राचार्यांचे शिक्का व स्वाक्षरीने **पोर्टलवर Upload करणे आवश्यक आहे. तसेच सोबत संबंधित अभ्यासक्रमाचे** संलग्नीकरण आणि विद्यापीठाचे/**शुल्क नियामक प्राधिकरणचे फी स्ट्रक्चरची प्रतही अपलोड करणे आवश्यक आहे.**

**पोर्टलवर** विचारण्यात आलेल्या शुल्कांपैकी एखादे शुल्क **अवास्तव (कमी / जास्त) असल्याचे तसेच सदर शुल्कास संबंधित प्राधिकरणाची मान्यता नसल्याचे निदर्शनास आल्यास व त्याव्दारे शासनाचे अथवा विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व्यक्तिशः जबाबदार धरुन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबददल नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

(युवराज सांळूखे)
विभागीय नोडल अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत:
मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

ST. WILFRED'S COLLEGE OF LAW SHEDUNG PANVEL 410206

PRINCIPAL
ST. WILFRED'S COLLEGE OF LAW
SHEDUNG-PANVEL 410206